# भरती जाहिरात

## बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) अमरावती उत्तर

### (फक्त उर्दू भाषिकांसाठी)

एकात्मिक बालविकास सेवा योजने अंतर्गत कार्यरत बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, (नागरी ) अमरावती उत्तर भागातील रिक्त असलेल्या **नगरपरिषद अचलपुर, दर्यापुर, अंजनगावसुर्जी, धारणी अंगणवाडी मदतनिस (उर्दू भाषिक)** पदासाठी नगरपरिषद उत्तर क्षेत्रातील फक्त उर्दू भाषिक स्थानिक उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**अर्जाचा कालावधी -** २०.०८.२०२४ ते ०३.०९.२०२४ कार्यालयीन दिवसी (वेळ सकाळी १२.०० ते ५.००)

अधिक माहितीसाठी खालिल कार्यालयांत संपर्क साधावा तसेच सर्व माहिती **amravati.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. (अर्ज अंगणवाडी सेविकांकडे व्हॉटसॲपवर उपलब्ध आहे. त्याचा फोटो घ्यावा.)

**कार्यालयाचा पत्ता :-** बालविकास प्रकल्प कार्यालय, (नागरी) अमरावती उत्तर<br>
C\o ॲडव्होकेट विलास काळे यांची ईमारत रुखमणी नगर, अमरावती रोड (देवमाळी)<br>
परतवाडा तह. अचलपुर जि. अमरावती.

**बाल विकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अमरावती उत्तर**

**पत्ता :-** C\o ॲडव्होकेट विलास काळे यांची ईमारत रुखमणी नगर,

अमरावती रोड (देवमाळी) परतवाडा तह. अचलपुर जि. अमरावती.

**Email ID - cdpoachalpur@gmail.com**

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक- एबाविसे-२०२२/प्र.क्र.९४/का-६ दिनांक २ फेब्रुवारी २०२३ नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना ही केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंगणवाडी मदतनीसांचे रिक्त पदे सरळ नियुक्तीने (By Nomination) भरण्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी, (नागरी) अमरावती उत्तर नगरपरिषद **अचलपुर, दर्यापुर, अंजनगावसुर्जी व धारणी येथील** क्षेत्रातील फक्त स्थानिक **उर्दू भाषिक** पात्र महिला उमेदवारांकडुन अर्ज वरीलप्रमाणे नमुद पत्यावर मागणी करण्यात येत आहे. अंगणवाडी मदतनीस या मानधनी पदाच्या सरळ नियुक्तीसंदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रता, अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | अटी व शर्ती |
|---|---|---|
| १. | पदाचे नाव, | अंगणवाडी मदतनीस (मानधनी सेवा) |
| २. | मानधन | एकत्रित मानधन दरमहा रुपये ५५००/- मात्र (पाच हजार पाचशे रुपये मात्र) |
| ३. | पदाचे / कामाचे स्वरुप | अंगणवाडी सेविकांना सहाय्य करणे, दैनंदीन अंगणवाडी केंद्र उघडणे, अंगणवाडी स्वच्छता करणे, पिण्याचे पाणी भरणे , लाभार्थ्यांना अंगणवाडीत बोलावणे, अंगणवाडी सेविकांचे निर्देशानुसार कामे पार पाडणे . |
| ४. | शैक्षणिक पात्रता | किमान इयत्ता १२ वी उतीर्ण (राज्य शिक्षणमंडळ अथवा त्यास समकक्ष) |
| ५ | वास्तव्याची अट | उमेदवार हा स्थानिक प्रकल्पाअंतर्गत रहिवाशी असावा(स्थानिक रहीवाशी बाबत शासनाने निश्चीत केलेला पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे.)<br>१.गॅस कार्ड/ बँक पासबुक जाहीरातीच्या दिनांकाच्या किमानएक महिना अगोदरचे<br>२.घरटॅक्स पावती (घर भाडयाने असल्यास घरमालकाची अफीडीवीट कॉपी)<br>३.इलेक्ट्रीक बिल<br>४.राशन कार्ड<br>५.आध ार कार्ड<br>यापैकी उपलब्ध पुराव्यानुसार वास्तव्य ठरविण्याचे अधिकार कार्यालयाला राहतील.<br>वास्तव्यासंबंधी वाद उदभवल्यास चौकशी समितीमार्फत चौकशी करण्यात येईल. |
| ६ | वयाची अट | जाहीरात प्रसिध्दीची दिनांक २० /०८/२०२४ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३५ वर्षे आणि विधवा उमेदवारांसाठी वयोमर्यादा कमाल ४० वर्ष राहील |
| ७ | लहान कुटुंब | १) उमेदवारास जास्तीत जास्त २ हयात अपत्य<br>२) उमेदवाराला २ हयात अपत्यापेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यासह )अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्तीसाठी पात्र ठरणार नाही. जर सदर बाब नियुक्तीनंतर निदर्शनास आल्यास उमेदवाराला सेवेतुन तात्काळ सेवा मुक्त करण्यात येईल तसेच सेवा कालावधीमधे त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यासह)असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल. |
| ८ | भाषेचे ज्ञान | मराठी भाषा (उमेदवाराने इयत्ता १० मराठी भाषा विषयासह उतीर्ण असणे आवश्यक आहे) त्यासाठी १० वी बोर्ड सर्टीफिकेट आवश्यक .<br>ज्या अंगणवाडी /मिनी अंगणवाडी केंद्राकरिता अंगणवाडी सेविकेचे /मदतनिसचे /मिनी अंगणवाडी सेविकेचे नियुक्ती करावयाची आहे,अशा अंगणवाडी मधे ५०% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरीक्त इतर भाषा \(उदा उर्दु ,हिंदी,माळीया ,गोंड,कोकणी ,पावरी,कन्नड कोरकू ,तेलगू ,भिल्लोरी,बंजारा इ. पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर तेथील अंगणवाडी मधे सेविका किंवा मदतनिस किंवा अंगणवाडी सेविका यांच्या पदावर सदर भाषेचे ज्ञान असलेल्या (लिहीता व वाचता येणे) उमेदवाराची नियुक्ती करण्यात यावी. तथापी अशा उमेदवाराने १० वी |

| | | |
|---|---|---|
| | | अथवा परिशिष्ट अ मधे नमुद केलेल्या शैक्षणिक अर्हतेपैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उतीर्ण असणे आवश्यक राहील. |
| ९ | विधवा किंवा अनाथ उमेदवारांबाबत | विधवा उमेदवारासाठी मृत्यु दाखला व स्वप्रतिज्ञापत्र आवश्यक .<br>अनाथ असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. |
| १० | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे स्थानिक रहीवाशी असावे या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचा-यांना बदलीचे कोणतेही प्रावधान राहणार नाही. |
| ११ | मागासवर्ग प्रवर्ग | अनुसुचित जाती /अनु जमाती /इतर मागास प्रवर्ग /विमुक्त जाती /भटक्या जमाती /आर्थिक दृष्टया दुर्बल घटक /विशेष मागास प्रवर्ग या उमेदवारांनी प्रमाणपत्र सोबत जोडावे . |
| १२ | अनुभव | शासकीय यंत्रणेतील अंगणवाडी सेविका /मदतनिस /मिनी अंगणवाडी सेविका म्हणुन कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य |
| १३ | जाहीरात प्रसिध्दी | दिनांक १३/०८/२०२४ |
| १४ | अर्ज स्विकारण्याचा दिनांक | जाहीरात प्रसिध्द केल्याचा दिनांकापासुन कार्यालयीन कामकाजाच्या १० दिवसापर्यंत (दिनांक २०.०८.२०२४ ते ०३.०९.२०२४) व अर्ज स्विकारण्याची कार्यालयीन वेळ (सकाळी १२.०० ते दुपारी ५.०० वाजेपर्यंत ) |
| १५ | प्राथमिक यादी | अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम दिनांकापासुन १५ दिवस (कार्यालयात/नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येईल) |
| १६ | यादीस हरकती | कार्यालयात /नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासुन पुढील १० दिवसापर्यंत |
| १७ | भरतीची पुर्ण कार्यवाही | जाहीरात प्रसिध्द केल्यापासुन ९० दिवसात |
| १८ | प्रतिक्षा यादी | जर उमेदवार हा नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासुन ३० दिवसापर्यंत रुजू झाला नाही किंवा त्यास अपात्र ठरविण्यात आले तर प्रतिक्ष यादीतील गुणानुक्रमानुसार नियुक्त्ी देण्यात येईल. सदर प्रतिक्षा यादी निकाल जाहीर झाल्यापासुन १ वर्षा पर्यंत वैध राहील |
| १९ | निवड प्रक्रियेविरुध्द तक्रार किंवा अपील | १. प्राथमिक गुणानुक्रम यादीती ल कोणत्याही उमेदवाराची वैयक्तीक माहिती खोटी असल्याची अर्ज केलेल्या उमेदवारांची तक्रार असल्यास यादी प्रसिध्द झाल्यापासुन १० दिवसांच्या आत बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) अमरावती उत्तर यांच्या कडे लेखी स्वरुपात तक्रार करावी. त्यानंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही .<br>२. निवड यादी घोषित झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत मा.विभागीय उपायुक्त महिला व बालविकास अमरावती विभ ग अमरावती यांचेकडे अपील दाखल करता येईल. |
| २० | कागदपत्राच्या प्रती | अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या प्रती स्वतः स्वाक्षांकीत केलेल्या असाव्यात |
| २१ | अर्ज | जाहीरातीमधे दिलेल्या विहीत नमुन्यातच अर्ज करावा. |
| २२ | निवड प्रक्रिया | उमेदवाराच्या शैक्षणीक गुणपत्रिकेमधे् मिळालेल्या गुणांच्या आधारे ७५ गुण आणि अतिरीक्त २५ गुण हे शासन निर्णयाप्रमाणे देय आहे |
| २३ | पत्र व्यवहार | भरतीप्रक्रियेसंबधी अर्जदारास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही .सर्व सुचना जाहीरातीमधे अटी व शर्तीप्रमाणे असुन वेळोवेळी सुचना नोटीस बोर्डवर लावण्यात येतील . |
| २४ | रिक्त जागा असलेल्या केंद्रांची नावे | अमरावती उत्तर मधिल **अचलपुर, दर्यापुर, अंजनगावसुर्जी व धारणी येथील फक्त उर्दू भाषिक अर्ज स्विकारण्यात येतील.** |

| | | |
|---|---|---|
| २५ | एकूण मदतनिस रिक्त पदे:- २५ | **रिक्त जागा असलेल्या क्षेत्रांची नावे** |

| अक्र | कार्यक्षेत्र | रिक्त पदे |
|---|---|---|
| १ | अचलपुर | १४ |
| २ | दर्यापुर | ०१ |
| ३ | अंजनगाव सुर्जी | ०९ |
| ४ | धारणी | १ |
| **५** | **एकुण** | **२५** |

बालविकास प्रकल्प अधिकारी
(नागरी) अमरावती उत्तर